महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

Email:
jeevanshikshan@maa.ac.in

७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे- ४११०३०

Tel:
020-24476938

जा.क्र.राशैसंवप्रपमपु/प्रमा/परीक्षण सुधारित दर/२०२५-२६/०२५८९ दि.२८/०८/२०२५

विषय : खाजगी निर्मात्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्य/ई-साहित्य/शैक्षणिक चित्रपट/लघुचित्रपट, शैक्षणिक साहित्य संच, पोस्ट्र्स व अभ्यासक्रम विषयक पुस्तके आणि अवांतर वाचनासाठीची पुस्तके इत्यादी साहित्याचे परीक्षण शुल्क दरवाढीच्या परिपत्रकाबाबत...

संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र. २५ दि. ५ मार्च २०२०
२.जा.क्र.राशैसंवप्रपम/प्रमा/परीक्षण सुधारित दर/२०२२-२३/१०७४ दि.०२/०३/२०२३

परिपत्रक

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या कार्यालयाकडे राज्यभरातून विविध खाजगी निर्मात्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्य/ई-साहित्य/शैक्षणिक चित्रपट/लघुचित्रपट, शैक्षणिक साहित्य संच, पोस्ट्र्स व अभ्यासक्रम विषयक आणि अवांतर वाचनासाठीची पुस्तके इत्यादी परीक्षणासाठी येतात. साहित्याचे परीक्षण करण्यासाठी तज्ञांना आमंत्रित करण्यात येते. तज्ञांची कार्यशाळा घेऊन संबंधित साहित्याविषयी परीक्षण अहवाल तयार करुन संबंधितांना दयावा लागतो. यासाठी तज्ञांचे मानधन, भोजन, चहा, स्टेशनरी व इतर अनुषंगिक खर्च जास्त प्रमाणात होत असल्यामुळे परीक्षण दर सुधारीत करण्याचा प्रस्ताव परिषदेच्या विचाराधीन होता.

उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार परीक्षण शुल्कामध्ये दर २ वर्षांनी १० टक्के वाढ करण्याचे अधिकार मा.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार शैक्षणिक साहित्य/ई-साहित्य/शैक्षणिक चित्रपट/लघुचित्रपट, शैक्षणिक साहित्य संच, पोस्ट्र्स व अभ्यासक्रम विषयक पुस्तके आणि अवांतर वाचनासाठीची पुस्तके इत्यादी साहित्याचे परीक्षण शुल्काचे सुधारित दर खालीलप्रमाणे निश्चित येत आहेत.

Scanned with OKEN Scanner

अ) छापील साहित्य -

(अवांतर वाचन पुस्तके, अभ्यासक्रम विषयक पुस्तके , शब्दकोष व अन्य पूरक पुस्तके)

अ .क्र	पृष्ठ संख्या	जूने तपासणी दर (दि.०२/०३/२०२३ नुसार)	नवीन तपासणी दर (१०% वाढ नुसार)	द्वितीय तपासणी दर (योग्य साहित्य वगळून)
१.	१ ते २० पृष्ठे	५५०/-	६०५/-	६०५/-
२.	२१ ते ५० पृष्ठे	१,६५०/-	१,८१५/-	१,८१५/-
३.	५१ ते १०० पृष्ठे	२,२००/-	२,४२०/-	२,४२०/-
४.	१०० ते २०० पृष्ठे	२,७५०/-	३,०२५	३,०२५
५.	२०० पृष्ठ संख्येच्या पुढे	रु.२०/- (Back to Back)	रु.२२/- (Back to Back)	रु.२२/- (Back to Back)

ब) ई- साहित्य - (Online स्वरूपात)

अ. क्र	साहित्य प्रकार	जूने तपासणी दर १ जी.बी पर्यंत (दि.०२/०३/२०२३ नुसार)	नवीन तपासणी दर १ जी.बी पर्यंत (१०% वाढ नुसार)	जूने तपासणी दर १ जी.बी च्या पुढे प्रत्येक जी.बी. साठी (दि.०२/०३/२०२३ नुसार)	नवीन तपासणी दर १ जी.बी च्या पुढे प्रत्येक जी.बी साठी (१०% वाढ नुसार)
१.	ऑडीओ डीव्हीडी	२,२००/-	२,४२०/-	प्रत्येक जी.बी साठी रु.२,२००/-	२,४२०/-
२.	व्हिडीओ, खेळ / प्रश्नसंच इ.	५,५००/-	६,०५०/-	प्रत्येक जी.बी साठी रु.५,५००/-	६,०५०/-

क) शैक्षणिक चित्रपट / लघुचित्रपट –

अ. क्र	कालावधी	जूने तपासणी दर (दि.०२/०३/२०२३ नुसार)	नवीन तपासणी दर (१०% वाढ नुसार)
१.	१ तासापर्यंत	११,०००/-	१२,१००/-
२.	१ ते २ तास	१६,५००/-	१८,१५०/-
३.	२ तासांच्या पुढे	२७,५००/-	३०,२५०/-

Scanned with OKEN Scanner

ड) शैक्षणिक साहित्य संच/कार्ड/पोस्टर्स/खेळ

अ. क्र	वस्तू	जूने तपासणी दर (दि.०२/०३/२०२३ नुसार)	नवीन तपासणी दर (१०% वाढ नुसार)
१.	१ ते १० वस्तू	२,२००/-	२,४२०/-
२.	१ ते २० वस्तू	३,३००/-	३,६३०/-
३.	१ ते ३० वस्तू	५,५००/-	६,०५०/-
४.	५० वस्तू पर्यंत	११,०००/-	१२,१००/-
५.	५१ व पुढील प्रत्येकी १० वस्तूसाठी	-	२,४२०/-

उपरोक्त सर्व साहित्यांच्या पुनर्परीक्षणाबाबत जेवढ्या साहित्यामध्ये दुरूस्ती सुचविण्यात आल्या आहेत तेवढ्या साहित्यांची परिगणना करून उपरोक्त दराप्रमाणे शुल्क आकारण्यात येतील.

सदर अ,ब,क आणि ड या साहित्य प्रकारांच्या परीक्षणाचे सुधारीत दरवाढ या आदेशाच्या दिनांकापासून संबंधित खाजगी निर्मात्यांना/कंपन्याना लागू होतील.

29/04/25

(राहूल रेखावार भा.प्र.से.)
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे

प्रत माहितीसाठी

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
३. मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
४. मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. शिक्षण संचालक, (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
६. शिक्षण उपसंचालक (सर्व)
७. सर्व सहसचिव/उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय
८. निवड नस्ती (प्रशिक्षण)

Scanned with OKEN Scanner